# ऋणनिर्देश

"केशव मेश्राम यांच्या कथेतील समाज जीवन : एक अभ्यास ('धगाडा' व 'चिखलचोथा' या कथासंग्रहाच्या आधारे)" या विषयावरील एम्.फिल्. (मराठी) पदवीसाठी लघुप्रबंध सादर करताना मला आनंद होतो आहे. या संशोधन कार्यासाठी ज्यांनी ज्यांनी मला बहुमोल सहकार्य केले त्या सर्वांच्या प्रती ऋण व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो. माझ्या संशोधनाचे मार्गदर्शक **डॉ. सुनिल चंदनशिवे** यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणे अशक्य आहे. सरांचा प्रेमळ स्वभाव, विद्यार्थ्यांला समजून घेण्याची वृत्ती, अभ्यासातील व्यासंग, सहकार्याची भावना, विद्यार्थ्यांविषयी प्रेम व आपलेपणा या सर्व गुणांमुळे मी भरपूर काही शिकलो. सरांनी मला फक्त संशोधनातच मदत केली नाही तर सकारात्मक दृष्टिकोन बाळगूण आयुष्य कसे घडवायचे व जगायचे याबाबत अनमोल मार्गदर्शन केले. हे मार्गदर्शन माझ्या भावी आयुष्यासाठी नक्कीच वरदान ठरेल.

त्याचप्रमाणे मराठी विभागातील आदरणीय विभाग प्रमुख **प्रा. डॉ. रविंद्र ठाकूर,** डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. कृष्णा किरवले, डॉ. रणधीर शिंदे आणि हिमांशू स्मार्त यांचेही वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच विभागातील लिपीक वनित शिगांवकर व मिनाक्षी स्वामी यांच्या सहकार्याबद्दल आभार.

माझ्या संशोधन कार्यासाठी प्रोत्साहन व बळ देणारे आणि ज्यांच्या प्रेरणेशिवाय हा लघुप्रबंध पूर्ण होऊ शकला नसता अशा माझ्या प्रेमळ आई सौ. शारदादेवी, वडील श्री. पी. डी. कांबळे (सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी) व नेहमीच मला आशिर्वाद दिलेल्या माझ्या आजी कै. कृष्णामाई यांच्या ऋणातच राहणे मी पसंत करेन. त्याचप्रमाणे पत्नी सौ. शुभांगी, मुलगा चि. सार्थक, दादा डॉ. दिपक सरनाईक, वहिनी

डॉ. नमिता सरनाईक, चि. राजवैभव, लहान भाऊ श्री. विजयकुमार सरनाईक, वहिनी सौ. नम्रता यांनी माझ्या संशोधन कार्यासाठी दिलेले प्रोत्साहन अनमोल आहे.

तसेच हा प्रबंध पूर्ण करण्यासाठी ज्यांनी मला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य केले ते माझे सन्मित्र सतिश शिंदे, किरण कांबळे, विष्णू केसरकर, तुषार गायकवाड, सचिन किल्लेदार, नागेश सुयवंशी, अमोल कांबळे, विठ्ठल रणदिवे या सर्वांचे ऋण व्यक्त करण्यापेक्षा यांचा आवर्जून उल्लेख करताना मला विशेष आनंद होत आहे.

तसेच या लघुप्रबंधाचे टंकलेखन वेळेत पूर्ण करून दिल्याबद्दल श्री. गणेश आनंदराव पाटील यांचाही मी आभारी आहे.

या सर्वांच्या प्रेरणेमुळे व सहकार्यामुळेच हा लघुप्रबंध पूर्ण होऊ शकला. या सर्वांविषयी मी अत्यंत कृतज्ञ आहे.

स्थळ : कोल्हापूर

दिनांक :

**उदयसिंगराव पांडुरंग कांबळे**

अभ्यासक

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR